# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**बांधकाम कामगारांना विविध लाभ देण्यासाठी प्रमाणपत्राकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नोंदणीची प्रमाणपत्राबाबत**

**(१) १३३४२ (०७-०४-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने बांधकाम कामगारांना विविध लाभ देण्यासाठी प्रमाणपत्राकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नोंदणीची तसेच प्रमाणपत्र असण्याची सक्ती परिपत्रकाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त यांनी बांधकाम मंजूरांना प्रमाणपत्र देण्यास असमर्थता दाखविली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शहरातील जवळपास आठ ते दहा हजार बांधकाम मजूरांना अडचणी निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने दिलेले आदेश महानगरपालिका प्रशासन पाळत नाही याबाबत शासनाने महानगरपालिकेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कोल्हापूर महानगरपालिका हद्दीमध्ये बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र देण्यासाठी दि. १३.१.२०१५ पासून संबंधित विभागीय कार्यालयाचे उप-शहर अभियंता यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

## भातकुली नगरपंचायत (जि.अमरावती) येथे प्रशासकीय भवन बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) २१४४६ (०७-०५-२०१६). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील भातकुली हे तालूक्याचे गाव असून २ महिल्यापूर्वी या ठिकाणी शासनाने नगर पंचायतचा दर्जा दिला आहे, यापूवी या ठिकाणी ग्रामपंचायत असल्याने शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने भातूकली गावातील वार्डांचा व गावाचा रस्ते, नाल्या, बहूउद्देशिय भव्य सभागृह व इतर सुविधेची कामे या ठिकाणी होऊ शकली नाही. त्यामुळे आता या ठिकाणी नगरपंचायत दर्जा दिल्याने या ठिकाणी प्रशासकीय इमारत व या गावातील कामे करण्यासाठी २५ कोटी रु. शासन भातकुली नगर पंचायतीला मंजुर करुन देणार आहे काय,

(२) असल्यास शासनाकडून मंजुर करुन देणाऱ्या निधीतुन भातकुली गावात बहुउद्देशिय सभागृह, रस्ते, नाल्या व इतर सुविधेची कामे भातकुली गावातील नागरिकांकडून वारंवार मागणी होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :** (१), (२) व (३) भातूकली नगरपंचायत, जि.अमरावती ही नव्याने नगरपंचायत स्थापन करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक २४/०६/२०१२ अन्वये नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायती अंतर्गत विविध सोई-सुविधांकरिता निधी उपलब्ध करुन देते. त्यानुसार भातूकली नगरपंचायतीस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## काशिद (जि.पालघर) कोपर येथील सरकारी पड जमीन पाणी पुरवठा योजना उपांगे व सार्वजनिक उपक्रमासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत

**(३) २७३४६ (२९-०७-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काशिद कोपर (ता.वसई) येथील सर्व्हे क्र.१९१ मधील सरकारी पड जमीन पाणी पुरवठा योजना उपांगे व सार्वजनिक उपक्रमासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेसाठी दिनांक १६ डिसेंबर, २०१३ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठा योजना उपांगे व सार्वजनिक उपक्रमांसाठी प्रस्तुत जमीन उपलब्ध करुन देण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, त्याचा तपशिल काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी, पालघर तसेच उपवनसंरक्षक ठाणे, विभाग ठाणे यांच्या अहवालानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेने मागणी केलेले क्षेत्रास "संरक्षित वन" दर्जा लागू आहे. सबब सदर जागेवर वनेतर प्रयोजनासाठी वन विभागाची मान्यता आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वनेतर प्रयोजनासाठी वन विभागाकडे प्रस्ताव सादर करुन त्यांची मान्यता घेण्याबाबत वसई-विरार महानगरपालिकेस सूचना देण्यात आल्या आहेत.

---

## पुणे येथे लोकशाही अण्णाभाऊ साठे महोत्सव आयोजनात नियमबाह्यपणे निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याबाबत

**(४) २९५०९ (२३-१२-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महोत्सवाचे आयोजनात नियमबाह्यपणे निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्या व कार्यक्रमासाठी पंधरा लाख रुपयांचा खर्चही संबंधित ठेकेदाराला गडबडीत देण्यात आल्याबाबतचा आरोप एका संघटनेने केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पालिकेच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यस विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६) :** (१) दिनांक ३.८.२०१५ रोजी श्री.विजय राजे यांनी विशिष्ट लोकाची मक्तेदारी निविदेमध्ये दिसून येते, अशा प्रकारे निविदा काढणे महानगरपालिकेच्या नियमाविरुध्द असून यामध्ये निकोष स्पर्धा होऊ शकत नाही असे निवेदन दिले आहे. तसेच अध्यक्ष मागासवर्गिय संघ यांनी कार्यक्रमाची नव्याने आखणी करावी, या कार्यक्रमाची निविदा प्रक्रिया चुकीच्या पध्दतीने राबविली असे निदर्शलास आले आहे अशी तक्रार केलेली आहे.
(२) पुणे महानगरपालिकेच्या नगरसचिव कार्यालयाच्या दिनांक १७.७.२०१५ च्या पत्रान्वये कार्यक्रमाची यादी मुख्य व्यवस्थापक सांस्कृतिक केंद्रे यांना प्राप्त झाली होती. त्यानुसार प्रस्तुत कार्यक्रम दिनांक ८.८.२०१५ ते दिनांक १०.८.२०१५ असा आयोजित केला होता. दिनांक २४.७.२०१५ रोजी पुणे महानगरपालिकेकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. पुणे

महानगरपालिकेकड प्राप्त झालेल्या ६ निविदांपैकी सर्वात कमी दर असलेल्या निविदाधारकास विहीत कार्यपध्दतीनुसार छाननी करुन सक्षम प्राधिकरणाऱ्याच्या सहमतीने दिनांक ७.८.२०१५ रोजी मान्यता देण्यात आली आहे. या प्रकरणी कार्यक्रमाची यादी व प्रत्यक्ष कार्यक्रम यामध्ये अल्प कालावधी उपलब्ध असल्याने निविदा प्रक्रिया तातडीने करण्यात आली हे काही अंशी खरे आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील किरोळ घाटकोपर येथील सदभावना व न्यु त्रिमूर्ती को.ऑ सोसायटी झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) ३२७१० (२१-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९७७ मध्ये राजपत्राद्वारे सीटीएस ३९९६, ३९९७, ३९९९, ४०००, ४००१, ४००२(अे), ४००३ स्थित कीरोळ गाव, घाटकोपर,कुर्ला तालुका,मुंबई ही जागा सेक्शन ४(१) महाराष्ट्र झोपडपट्टी पुनर्वसन कायदा १९७१ च्या अंतर्गत झोपडपट्टी जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर सदभावना एसआरए को.ऑ.सोसायटी व न्यु त्रिमूर्ती एस आर ए को.ऑ सोसायटी स्थापन करण्यात आली असून ह्या सोसायट्यांच्या परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२ करतांना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व मुळ रहिवाश्यांव्यतिरिक्त वाढीव रहिवाशी दाखविण्यात आल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदभावना एस आर ए को.सोसायटीचे एल ओ आय माहे नोव्हेंबर, २०१२ मध्ये करण्यात येऊनही परिशिष्ट-१ मध्ये ५१० रहिवाशी दाखविण्यात आले आहेत तर परिशिष्ट-२ मध्ये ६६८ रहिवाशी दाखविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदभावना सोसायटीमध्ये परिशिष्ट-२ मध्ये १५८ रहिवाशी वाढीव दाखविण्यात आले आहे तर न्यु त्रिमूर्ती एस आर ए को ऑ.सी.टी.एस नं ३९९७ हे परिशिष्ट-१ मध्ये १७५ रहिवाशी दाखविण्यात आले असून २०१० च्या परिशिष्ट-२ मध्ये ३०९ रहिवाशी दाखविण्यात आले असून परिशिष्ट २ मध्ये १३४ रहिवाशी वाढीव दाखविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, न्यू त्रिमूर्ती सोसायटीमध्ये मुळ ३०९ रहिवाशांना परवानगी दिली असून त्यातीलही ५० टक्के लोकांच्या सह्या चुकीच्या असल्याचे तसेच काही मयत व्यक्तीच्या नांवे स्वीकृत सही दाखविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(७) तदनुसार उपरोक्त सोसायट्यांच्या गैरव्यवहाराबाबत जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-११-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे. सदरहू क्षेत्रामध्ये सी.टी.स. क्र. ४००३ चा समावेश नाही.

(२), (३) व (४) मौजे घाटकोपर किरोळ, ता.कुर्ला येथील सिटीएस क्र. ३९९६ (पै), ३९९७ (पै), ३९९८ (पै), ३९९९ (पै), ४००० (पै), ४००१, ४००२ (पै) आणि ४००२ अे या खाजगी व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जागेवर सदभावना व न्यू त्रिमूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्थांची एकत्रित योजना राबविण्यात येत आहे. त्यामधील सदभावना सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये एकूण ४०६ झोपडीधारक व न्यू त्रिमूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये एकूण ३२४ झोपडीधारकांचा समावेश आहे. सदभावना सहकारी गृहनिर्माण संस्थेचे खाजगी जमिनी संदर्भात अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे यांनी दि.२०/११/२००८ रोजी ३५९ झोपडीधारकांचे प्रमाणित परिशिष्ट-२ निर्गमित केले आहे. त्यानंतर दि.२२/८/२०१३ रोजी ४२ झोपडीधारकांचे पुरवणी परिशिष्ट-२ निर्गमित केले आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जमिनीसंदर्भात सहाय्यक आयुक्त, एन विभाग यांनी दि. २२/१०/२००९ रोजी ५१ झोपडीधारकांचे परिशिष्ट-२ निर्गमित केले आहे. न्यू त्रिमुर्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ३०९ झोपडीधारकांचे प्रमाणित परिशिष्ट-२ अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे यांनी दि. १८/१/२०११ रोजी निर्गमित केले आहे.

(५) हे खरे नाही. सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांचा सर्व्हे करताना संबंधित झोपडीधारकांच्या स्वाक्षऱ्या/अंगठे सर्व्हे रजिस्टरला घेण्यात आलेले आहेत.

(६) व (७) सदरहू योजनेतील पात्रतेच्या अनुषंगाने श्री.संजय रामसजीवन दुबे यांनी उच्चस्तरीय समितीकडे दाखल केलेला अपिल अर्ज क्रमांक ७/२०१५ मध्ये समितीने दि.१०/३/२०१६ च्या आदेशान्वये सक्षम प्राधिकाऱ्यांना पात्रतेबाबत पुर्नपडताळणी करून अहवाल सादर करण्याचे आदेशित केले होते. त्यानुसार उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, घाटकोपर यांनी अर्जदाराच्या तक्रारीतील प्रकरणांची पुर्नपडताळणी करून अहवाल दि. २१/०७/२०१६ च्या पत्रान्वये सचिव/झोपुप्रा यांच्याकडे सादर केला आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यात गडहिंग्लज व गारगोटी (ता.भुदरगड) येथे बांधकाम कामगारांचे कार्यालय सुरु करणेबाबत

**(६) ३४४३६ (२१-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात गडहिंग्लज व गारगोटी (ता.भुदरगड) येथे बांधकाम कामगारांचे कार्यालय सुरु करणेबाबत सहाय्यक कामगार आयुक्त, कोल्हापूर यांचेकडे वारंवार मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम कामगारांना साहित्य खरेदीसाठी देण्यात येणारा प्रलंबित ३ हजार रुपयांचा धनादेश त्वरित मिळणेबाबत शासन निर्णय घेईल का,

(३) असल्यास, गडहिंग्लज व गारगोटी (ता.भुदरगड) येथे बांधकाम कामगारांचे कार्यालय सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२५-१०-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १० तालुक असून लांब पल्ल्यावर असलेल्या तालुक्यांच्या ठिकाणी (उदा.चंदगड, आजरा, गडहिंग्लज, भुदरगड) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे कामकाज करण्यात यावे, अशी तोंडी मागणी तेथील कामगार संघटना व कामगारांकडून वेळोवेळी करण्यात येते.
(२) साहित्य खरेदीकरिता रु. ३ हजार अर्थसहाय्यासाठी प्रलंबित २७३४ अर्जापैकी १८१६ लाभार्थ्यांची पडताळणी झाली असून त्यांच्या खात्यावर लाभ वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित ९१८ अर्जदारांच्या अर्जाची पडताळणी करुन पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, दिनांक ५.४.२०१६ रोजीच्या शासन पत्रान्वये मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांच्या प्रती कुटूंबास बांधकामासाठी उपयुक्त /आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरिता मंडळाकडून दर तीन वर्षातून एकदा रु. ५०००/- इतके अर्थसहाय्य देण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
(३) सहायक कामगार आयुकत, कोल्हापूर कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून गडहिंग्लज व भुदरगड तालुक्यांतील मंडळाचे कामकाज रुन घेण्यात येते. त्याचप्रमाणे, आवश्यकतेनुसार तालुक्यातील प्रमुख ठिकाणी कॅम्पचे आयोजन करुन मंडळाचे कामकाज पूर्ण करण्यात आले आहे,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील जंगोबाई देवस्थानाला 'क' दर्जाचे तिर्थस्थळ म्हणून मान्यता मिळण्याबाबत

**(७) ३६८२६ (१६-०१-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील जंगोबाई देवस्थानाला 'क' दर्जाचे तिर्थस्थळ म्हणून मान्यता मिळणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी, यवतमाळ यांना दि. ३० ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्यासुमरास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) क्षेत्रिय पातळीवर याबाबतची कार्यवाही सुरु आहे. जिल्हा प्रशासनाने याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना नगरपरिषदेस केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिंवडी (जि.ठाणे) तालुक्यातील एमएमआरडीए अंतर्गत समाविष्ट असलेल्या गावांच्या सुधारित आराखडयानुसार ५१ गावासाठी सुधारित विकास आराखडा तयार करण्याबाबत**

**(८) ३७७८१ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंवडी (जि.ठाणे) तालुक्यातील एमएमआरडीए अंतर्गत समाविष्ट असलेल्या गावांच्या सुधारित आराखडयानुसार ५१ गावासाठी सुधारित विकास आराखडा तयार करुन अनुसूचित क्षेत्रातील ५१ गावांच्या क्षेत्रामध्ये एम.आर.ॲण्ड टी.पी.ॲक्ट १९६६ कलम २६ अनुसार दिनांक २८ नोव्हेबर, २०११ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या आराखड्यात शेतकरी, लोक प्रतिनीधींनी दाखल केलेल्या हरकती व सूचनांची दखल न घेता सदर आराखडा मार्च, २०१५ मध्ये प्रसिध्द केल्या प्रकरणी, तेथील शेतकऱ्यांनी एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीत काय आढळून आहे व त्यानूसार संबंधीतांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्राप्त निवेदनावर संबंधितांचे अहवाल मागविण्यात आले असून, प्राप्त अहवाल भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्राच्या वगळलेल्या क्षेत्राच्या विकास योजनेवर निर्णय घेताना विचारात घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील संथ गतीने सुरु असलेल्या उड्डाणपुलांच्या कामांबाबत**

**(९) ४०४२८ (१६-०५-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील संथ गतीने सुरु असलेल्या उड्डाणपुलांच्या कामांमुळे शहराच्या वाहतूक कोंडीत भर पडून शासनाचा पैशाचा अपव्यय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोथरुड, डेक्कन चौक, संचेती इस्पितळाजवळील पूल, स्वारगेट चौक, पौड मार्ग, कर्वे मार्ग, सिंहगड, एनआयबीएम मार्ग हे भाग वाहतुकीच्या कोंडीचे प्रमुख केंद्र असून या ठिकाणीच्या सुरु असलेल्या उड्डाणपूलाच्या जवळपास ८०% कामांना कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे वारंवार मुदत वाढ दिली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे उड्डाणपुलाच्या खर्चात वाढ होऊन वाहतूक कोंडीत अधिकच भर पडत असल्याने कंत्राटदारावर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६) :** (१) ज्या चौकांमध्ये उड्डाणपूलांची कामे चालू आहेत त्या ठिकाणी गर्दीच्या वेळी काही प्रमाणात वाहतुकीची कोंडी होते.

(२) संचेती इस्पितळाजवळील अभियांत्रिकी महाविद्यालय चौक, स्वारगेट चौक, कर्वे रस्ता (कमिन्स कॉलेज) येथे उड्डाणपुलांची कामे चालू आहेत.

त्यापैकी स्वारगेट उड्डाणपूलाचे काम पूर्ण होवून दिनांक २७ मे २०१६ रोजी सदरचा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करणेत आलेला आहे. अभियांत्रिकी महाविद्यालय चौक व कमिन्स कॉलेज चौक येथील कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) उड्डाणपुलाच्य कामामध्ये विविध त्या त्या उड्डाणपूलाच्या जागेवरील परिस्थितीनुसार येणाऱ्या विविध अडचणी दूर करणेसाठी संबंधीतांशी समन्वय ठेवून सातत्याने प्रयत्न करणेत येत असतात.

उड्डाणपूलांचे काम प्रशासकीय अडचणीमुळे ज्या ठिकाणी घेता येत नाही त्या ठिकाणी विलंब होत असतो. निविदा अटी व शर्तीनुसार ठेकेदाराची दंडात्मक कारवाई करणेत येते. ज्या ठिकाणी प्रशासकीय अडचणींमुळे कामास विलंब होतो तेथे कामास मुदतवाढ द्यावी लागते.

कमिन्स कॉलेज चौकातील उड्डाणपूलाची कामाची गती निविदा अटी व शर्तीप्रमाणे न राखल्याने ठेकेदारावर दिनांक १५ जून, २०१५ पासून रक्कम रूपये ६०००/- प्रतिदिन याप्रमाणे दंडाची आकारणी करणेत येत असून, दिनांक ११.५.२०१६ पर्यंत रक्कम रूपये १९.९२ लाख इतका दंड आकारणेत आलेला आहे.

उड्डाणपूलांची कामे लवकर पूर्ण करणेसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत प्रयत्न करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद शहराला १५० एमएलडीच्या प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी जायकवाडी ते शहरापर्यंत नवीन मुख्य पाईपलाईन टाकण्याबाबत**

**(१०) ४२१०६ (१७-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराला १५० एमएलडीच्या प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी जायकवाडी ते शहरापर्यंत नवीन मुख्य पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात येत असुन हे काम करारानुसार सुरु नसल्याने संबंधित महानगरपालिकेच्या वतीने समांतर कंपनीला कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६) :** (१) औरंगाबाद समांतर जलवाहिनी प्रकल्पामध्ये मंजूर माईलस्टोननुसार कामांची गती राखण्यात येत असल्याने तसेच करारनाम्यातील तरतुदींनुसार कन्सेशना मार्फत प्रकल्पाविषयी झालेल्या अनेक अनियमितता पाहता औरंगाबाद महानगरपालिकेने कन्सेशनर यांना दिनांक ११.१२.२०१५ रोजी नोटीस दिली होती.

(२) व (३) औरंगाबाद महानगरपालिकने सवलतधारकाशी केलेला करारनामा रद्द करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

---

**पुणे येथील वसंतराव नाईक पक्षी अभयारण्य पाषण तलाव परिसरात अतिक्रमण झाल्याबाबत**

**(११) ४२३०० (०२-०६-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील वसंतराव नाईक पक्षी अभरयारण्य पाषण तलाव परिसर अतिक्रमणाच्या विळख्यात अडकला असल्याने येथील परिसंस्था धाेक्यात आली असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. पाषाण तलावाच्या पश्चिम बाजूस रिटेनिंगा वॉल आहे. उत्तर-पूर्व बाजूस तलावाचा बांध असून, दक्षिण-पूर्व मिलिटरी परिसर असल्याने, पाषाण तलावास अतिक्रमणाच्या धोक्याची शक्यता कमी आहे.

(२) सदरहू पाषाण तलावाच्या पश्चिमेस असणाऱ्या नॅशनल हायवे व तलावाची भिंत यामध्ये अतिक्रमण झालेल्या सुमारे ५० ते ६० झोपडया दिनांक ११.२.२०१६ व १२.२.२०१६ रोजी कारवाई करून काढून टाकण्यात आलेल्या असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याच्या दिनांक २३.३.२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बेस्ट उपक्रमाकडे अडीचशे गाडयांना पार्किंगची जागा मिळण्याबाबत**

**(१२) ४२४१५ (०३-०५-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.विजयकुमार गावीत (नंदुरबार) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट उपक्रमाकडे सध्या ४०९९ गाड्या असून यापैकी तब्बल अडीचशे गाडयांना रात्रीच्यावेळी पार्कींगसाठी जागाच नसल्यामुळे या गाडया बसस्थानकावर रस्त्यांवरच उभ्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गाडयांच्या सुरक्षिततेसाठी बेस्ट उपक्रमाला सुरक्षारक्षक नेमावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अडीचशे गाडयांना पार्किंगची जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे. जानेवारी, २०१५ च्या स्थितीनुसार बेस्ट उपक्रमाकडे ४२२८ बसगाडया होत्या, यापैकी २७ बस आगार व बसस्थानकांच्या क्षमतेनुसार ३८४९ बसगाडया पार्किंग करण्यात येत होत्या. उर्वरित बसगाडया रात्री बेस्ट उपक्रमाच्या बसस्थानकांमध्ये उभ्या करण्यात येत असून त्या रस्त्यावर उभ्या केल्या जात नाहीत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ पासून बेस्ट उपक्रमाच्या काळाकिल्ला बसआगार बसप्रवर्तनाकरीता सुरू करण्यात आले असून या बसआगाराची १२६ बसगाडया उभ्या करण्याची क्षमता आहे. तसेच, उर्वरित बसगाडया उभ्या करण्यासाठी मुलुंड (पूर्व), ट्रॉम्बे इत्यादी ठिकाणी नवीन बसआगारांच्या उभारणीकरीता बेस्ट उपक्रम प्रयत्नशील आहे.

---

**समाज कल्याण विभागाने राबविलेल्या भरती प्रक्रियेबाबत**

**(१३) ४२५६२ (२८-०४-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यासाठी असलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यालयात वापरण्यात येणारी युपीएस यंत्रणा ही १६ लाखांपेक्षा जास्त किंमतीची आहे. परंतु माहितीच्या अधिकारात ती केवळ ८ लाख ६१ हजार किंमतीची दाखविण्यात आली असल्याने यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आल्याचे दि. १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदी प्रक्रियेची संपूर्ण चौकशी करण्याची मागणी सुरक्षा रक्षक कामगार युनियनने केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनूसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहे ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२५-१०-२०१६) :** (१) अशा आशयाची बातमी दि.९/१/२०१६ रोजीच्या आपले महानगरप या स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली आहे. तथापि, माहिती अधिकारात फक्त युपीएस यंत्रणेची माहिती देणेबाबत मागणी केली असल्याने फक्त युपीएस यंत्रणेसाठी झालेल्या रु.८ लाख ६१ हजार एवढ्या खर्चाची माहिती मंडळाने अर्जदारास दिली आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उक्त प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यासाठी कामगार उप आयुक्त (प्रशासन) व सहायक कामगार आयुक्त, मुंबई यांची नियुक्ती केली आहे. चौकशी अहवालावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिका शिक्षक मंडळाने छपाईच्या कामाच्या खर्चात कपात करण्याबाबत**

**(१४) ४२५६६ (१३-०५-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिका शिक्षक मंडळाच्या शाळांमधील पटसंख्या कमी होत असतानाही शिक्षण मंडळाने केलेल्या छपाई कामाचा खर्च वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या छपाईच्या कामाच्या खर्चात कपात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
पुणे महानगरपालिकेच्या शिक्षणमंडळातील विद्यार्थ्यांसाठी प्रगती पुस्तके, उत्तरपत्रिका, सराव पुस्तिका, शालेय कामाकाजाकरिता टपाल वह्या, पगारपत्रके, फरक बिले नोंदवह्या व कार्यालयीन कामकाजाकरिता लागणारी सर्व प्रकारची छपाईची कामे पुणे महानगरपालिकेच्या मुद्रणालयाकडून वेळोवेळी करून घेण्यात येतात. विद्यार्थी पटसंख्या गेल्या ४ वर्षात कवळ १८९३ इतकी कमी झाली आहे. परंतु, त्यामुळे छपाई खर्चावर परिणाम झाल्याचे दिसून येत नसून मागणीनुसार छपाई करण्यात येते. सन २०१४-१५ वर्षापेक्षा सन २०१५-१६ मध्ये छपाई खर्च कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील औंध परिसरातील पाषाण तलावाच्या सौंदर्यीकरणाबाबत

**(१५) ४२६४९ (०७-०५-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील औंध परिसरातील १ एकर क्षेत्र असलेल्या पाषाण तलावात हिवाळयात परदेशातून यापूर्वी अनेक विविध पक्षी येत असत परंतू सध्या या तलावावर संपूर्ण जलपर्णी पसरली असल्याने येथील जलचरांना धोका निर्माण झाल्याने पक्षांना खाद्य मिळत नसल्याने तसेच भटक्या कुत्र्यांचा वावर वाढल्याने पक्षांची शिकार होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिनस्त किटक प्रतिबंधक विभागामार्फत औंध परिसरातील पाषाण तलावातील जलपर्णी निर्मुलनाचे काम नियोजन पध्दतीने उपलब्ध सेवकमवर्गामार्फत करण्यात येत आहे. औंध परिसरातील पाषाण तलावातील जलपर्णीचे जवळपास निर्मूलन करण्यात आले आहे. तसेच, भटक्या व मोकाट कुत्र्यांवर प्राणी जन्म नियंत्रण नियम २००१ नुसार काम करण्यात येते. पुणे शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडून त्यांचेवर नसबंदी शस्त्रक्रिया व ॲन्टी रेबीज लसीकरण करून पुन्हा तीन दिवसांनी पकडलेल्या ठिकाणीच सोडले जातात. त्यांना मारण्यात येत नाही. शस्त्रक्रिया केलेले श्वान जिवंत असेपर्यंत त्यांची संख्या आटोक्यात आल्याचे दिसून येते तसेच भटक्या कुत्र्यांमुळे पक्षांची शिकार होत असल्याचे आढळलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) शहरातील रस्ते दुरुस्ती करण्याबाबत**

**(१६) ४३१८४ (०७-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) या शहरामध्ये दैनंदिन वर्दळीचे रस्ते अतिशय खराब झाले असल्यामुळे सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास मा.अर्थमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०१६) :** (१) व (२) निधी उपलब्धतेकरीता विविध लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त होतात. विविध निवेदनाच्या अनुषंगाने रु. ७५.०० लक्ष इतके अनुदान "रस्ता अनुदान" या योजने अंतर्गत मालेगाव मनपाला वितरीत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील घाटकोपर येथील जनता बुध्दनगर श्री साईधाम को. ऑप.हौ. सोसायटी मधील रुम सोसायटीतील पदाधिकाऱ्यांनी विकल्याप्रकरणी चौकशी करणेबाबत**

**(१७) ४६३५२ (०३-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर येथील जनता बुध्दनगर श्री साईधाम को. ऑप.हौ. सोसायटी मधील सी.टी.एस. नं. ५९८६ (पी.टी) ई.पी.नं. पी.टी.टी.पी स्फीय या भुखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत वितरीत व आरक्षित करण्यात आलेल्या रुम, सोसायटीतील पदाधिकाऱ्यांनी विकल्याप्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी मा. गृहनिर्माण राज्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-११-२०१६) :** (१) होय.

(२) सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या तक्रारीस अनुसरून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिरणाच्या अधिकाऱ्यांनी संस्थेत जावून पहाणी केली असता संस्थेमधील दोन सामाजिक केंद्र व एक बालवाडी व संस्थेच्या कार्यालयाचा १ गाळा अनधिकृत लोक वापर करित असल्याचे आढळून आले आहे. यासंदर्भात प्राधिकरणाने दि.२५/५/२०१६ च्या पत्रान्वये अनधिकृत वापर करणाऱ्या गाळेधारकांविरूध्द निष्कासनाची कार्यवाही करण्याबाबत उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, घाटकोपर यांना कळविले आहे. त्याचबरोबर गाळयांची परस्पर विक्री

करणे/भाडयाने दिल्याबाबत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्याबाबत वरिष्ठ पोलिस निरीक्षक, पंतनगर पोलिस ठाणे, घाटकोपर (पूर्व) यांना देखिल दि.२५/५/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बडनेरा तालुका जिल्हा अमरावती येथील जुनी वस्ती येथील पाण्याची टाकी बांधकाम करणेबाबत**

**(१८) ४९६२९ (०७-०५-२०१६). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बडनेरा तालुका जिल्हा अमरावती येथील जुनी वस्ती येथील जीर्ण झालेली पाण्याची टाकी पडली असून सदर पाण्याची टाकी केंद्र शासन अमृत योजनेतून बांधण्याचा प्रस्ताव महानगरपालिका, अमरावती यांनी त्यांचे पत्रक ०५/२०१६ दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी नगरविकास विभाग मंत्रालय यांना पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टाकी बांधकामासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६) :** (१), (२) व (३) बडनेरा तालुका जि.अमरावती येथील जुनी वस्ती येथे जीर्ण झालेली पाण्याची टाकी पडली आहे, हे खरे आहे.
केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत रु. ११४.३५ कोटी किंमतीच्या पाणी पुरवठा प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पामध्ये सदर पाण्याची टाकी बांधण्याचे अंर्तभूत आहे.

---

**भातकुली नगरपंचायत (जि.अमरावती) येथे प्रशासकीय भवन बांधकामास निधी मिळणेबाबत**

**(१९) ४९६४४ (०७-०५-२०१६). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भातकुली नगरपंचायत (जि.अमरावती) येथे नव्याने स्थापन झाली आहे या ठिकाणी पदाधिकारी, मुख्याधिकारी यांना बसण्यासाठी व प्रशासकीय कामे करण्यासाठी येथे कार्यालय नाही त्यामुळे प्रशासकीय भवन बांधकाम करण्यासाठी रुपये ०५ कोटी शासनाने मंजूर करावे अशी मागणी संबंधित लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :**(१) व (२) भातकुली नगरपंचायत, जि.अमरावती ही नव्याने नगरपंचायत स्थापन करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक २४/०६/२०१२ अन्वये नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायती अंतर्गत विविध सोई सुविधांकरिता निधी उपलब्ध करुन देते. त्यानुसार भातकुली नगरपंचायतीस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) कार्यवाही सुरु आहे.

---

**आष्टी, पाटोदा व शिरुर (जि. बीड) नगरपंचायतींना नगरपरिषदेप्रमाणे निधी मिळण्याबाबत**

**(२०) ५१४२५ (०७-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी, पाटोदा व शिरुर (जि. बीड) नवनिर्मिती झालेल्या नगरपंचायतींना नगरपरिषदेप्रमाणे निधी प्राप्त होत नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदरहू नवनिर्मिती झालेल्या नगरपंचायतींना विकासकामांसाठी आवश्यक निधी अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) राज्यात नव्याने स्थापना झालेल्या नगरपंचायतींना निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नगरपंचायतींना शासनाकडून विविध विकासकामांसाठी मिळणाऱ्या निधीबाबत**

**(२१) ५१४२६ (०७-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नगरपंचायतींना शासनाकडून विविध विकासकामांसाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नगरपंचायतींना सदर निधी देण्याबाबतचे निकष काय आहेत,
(३) असल्यास, राज्यातील किती नगरपंचायतींनी आजतागायत सदर निकषांची पूर्तता केली आहे आणि सन २०१५-१६ मध्ये एकूण किती रुपयांचा निधी शासनाने नगरपंचायतींना वितरीत केला आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :** (१) होय.

(२) दिनांक २७ जून, २०१२ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील नगरपंचायतींना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याच्या विनियोगाचे निकष निश्चित केले आहेत.

(३) वित्तीय वर्ष सन २०१५-१६ मध्ये राज्यातील नगरपंचायतींना रुपये ७०.८७५ कोटी निधी वितरीत केलेला आहे.

---

**राज्यातील माथाडी कामगारांच्या विविध मागण्यांबाबत**

**(२२) ५१४६६ (०७-०५-२०१६). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माथाडी कामगारांच्या विविध मागण्यांवर निर्णय घेतला जावा याकिरता माथाडी कामगार संघटनांनी मा. मुख्यमंत्री, मा. कामगारमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान तसेच यापूर्वी वारंवार निवेदने सादर केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी माथाडी कामगारांनी निवेदनात केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच सदर प्रकरणी माथाडी कामगारांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२५-१०-२०१६) :** (१) माथाडी कामगारांच्या विविध महागण्यासंदर्भातील श्री.अजित पवार, विधानसभा सदस्य तथा विधी मंडळ पक्षतेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच श्री.नरेंद्र पाटील, विधापरिषद सदस्य तथा सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, मुंबई यांची अनुक्रमे दि. २८/०९/२०१५ व दि.०२/०२/२०१६ रोजीची मा.मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेली निवेदने प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे.

(२) व (३) सदरहू दोन्ही निवेदनांद्वारे त्यांनी माथाडी कामगारांसंदर्भात नगरविकास विभाग, पणन व कामगार विभागाअंतर्गत प्रलंबित असलेल्या मुख्यत्वे माथाडी मंडळाच्या प्रतिनिधीक मंडळाच्या पुर्नरचना करणे, मंडळाच्या सेवेत माथडी कामगारांच्या मुलांना प्राधान्य देणे, बाजार समित्यामधील नियमन कायम ठेवणे, बाजार समित्याच्या आवारात सुविधा उपलब्ध करुन देणे, फॅक्टरीतून माथाडी कायदा व वगळणे विविध रेल्वे यार्डात माथाडी कामगारांना सुविधा उपलब्ध करुन देणे, वडाळा व चेंबुर येथील घरकुल योजना पुर्णत्वास नेणे, किरकोळ व्यापार धोरण २०१५ च्या मसुद्यास अनुसरुन कामगार संघटनांच्या हरकती/ सूचना विचारात घेणे इ. मागण्या केलेल्या असून या संदर्भात सर्व संबंधित विभागांची मा.मुख्यमंत्री महोदयांकडे संयुक्त बैठक आयोजित करण्यासाठी उक्त निवेदनातील कामगार विभागाशी संबंधित मुद्यानुषंगाने केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती मा.मुख्यमंत्री सचिवालयास दि. ३०/३/२०१६ रोजी पाठविण्यंत आलेली आहे.

---

### राज्यातील औद्योगिक कामगारांना मिळणारे किमान वेतन एक समान मिळणेबाबत

**(२३) ५१५५५ (०३-०५-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन राज्या-राज्यामध्ये औद्योगिक कामगारांना देय वेतनामध्ये खुप तफावत असल्यामुळे राज्यातील औद्योगिक कामगारांना मिळणारे किमान वेतन एक समान असावे या दृष्टीने व्यापक सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील औद्योगिक कामगारांना मिळणारे किमान वेतन एकसमान असावे, याबाबत केंद्र शासनाकडून कोणतेही दिशानिर्देश अद्याप प्राप्त झालेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गोराई (बोरिवली) येथील न्यू एम. एच. बी. कॉलनीच्या पुनर्विकासामध्ये विकासकाने बनावट कागदपत्रे बनवून एफ. एस. आय.हडप केल्याबाबत

**(२४) ५३६७३ (२९-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवलीच्या गोराई येथील न्यू एम. एच. बी. कॉलनी व अष्टविनायक नगर गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासामध्ये विकासकाने बनावट कागदपत्रे बनवून एफ. एस. आय. हडप केल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कागदपत्रे बनवण्यासाठी म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी विकासकाला मदत केल्याचे स्थानिक रहिवाशांचा आरोप आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-१०-२०१६) :** (१), (२) व (३) अष्टविनायक नगर युनियन यांनी पुनर्विकास प्रकल्पासंदर्भात विविध मुद्दयांबाबत दि. ५.४.२०१६ रोजी म्हाडाकडे तक्रार केलेली आहे. युनियनने उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत युनियन व विकासक मे.साई ली डेव्हलपर्स यांच्यामध्ये विविध न्यायालयीन दावे प्रलंबित असून सदर दाव्यात मा.न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येइल. असे मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## पुणे शहरातील भांडारकर संशोधन संस्थेने संस्थेच्या आवारातील जुने वृक्ष बेकायदा परवानगीविना तोडण्यात आल्याबाबत

**(२५) ५४१८३ (२४-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील भांडारकर संशोधन संस्थेने संस्थेच्या आवारातील दोन वृक्षांच्या तोडीचा परवाना घेतला असतांना किमान २० ते २५ जुने वृक्ष बेकायदा परवानगीविना तोडण्यात आल्याचे माहे मार्च २०१६ मध्ये दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरेख, गर्द अशा वृक्षराजीने नटलेल्या संस्थेच्या आवारातील वृक्ष तोडून वृक्षतोड केलेल्या ठिकाणी पडलेले खड्डे बुजवून पुरावा नष्ट करण्याचा गंभीर प्रकार संस्थेने केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती ठोस पावले उचलली आहेत काय,

(४) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(५) सदर तपशील उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६) :** (१) भांडारकर संशोधन संस्थेने संस्थेच्या आवारातील दोन सुबाभुळ वृक्ष विनापरवाणा तोडल्याचे फेब्रुवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, सदर प्रकरणी दोन वृक्ष अनधिकृत काढलेबाबत भांडारकर संशोधन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द मा.ज्यु.मॅजेस्ट्रेट वर्ग-१ पुणे येथे फौजदारी खटला क्र.३२/२०१६ व फौजदारी खटला क्र. ७२/२०१६- दाखल केलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई तुर्भे एमआयडीसीतील स्वीझेरा लॅब प्रा. ली. कंपनीतून कामगारांना काढून टाकल्याबाबत

**(२६) ५४२८९ (२९-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, तुर्भे एमआयडीसीतील स्वीझेरा लॅब प्रा. लि. कंपनीतून ४६ भूमिपुत्र कामगारांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता कामावरून काढून टाकण्यात आल्याचे दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीमध्ये बाहेरून कंत्राटी कामगार आणून कंपनी चालवण्यात येत असल्याने कामगारांनी कंपनी व्यवस्थापना विरोधात आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामगारांना कामावर घेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (१५-११-२०१६) :** (१) आस्थापनेतील सर्व नियमित ४६ कामगारांना कामावरुन कमी करण्यात आले आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर आस्थापनेत दोन कामगार संघटना कार्यरत असून त्या नियमित ४६ कामगारांचे नेतृत्व करतात. त्यातील नवी मुंबई श्रमिक सेना या कामगार संघटनेने दिनांक ०६/४/२०१६ रोजी आणि श्रमिक सेना या कामगार संघटनेने दिनांक २७/०४/२०१६ रोजी औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे महाराष्ट्र कामगार संघटनांना मान्यता आणि कामगार अनुचित प्रथा प्रतिबंध अधिनियम, १९७१ च्या (MRTU & PULP Act) अन्वये अनुक्रमे युएलपी तक्रार क्र. ९२/२०१६ व ११३/२०१६ दाखल केली असून सदर प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असून ती न्यायप्रविष्ठ आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध क्षेत्रातील असंघटीत कामगारांसाठी एकच कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(२७) ५४६७२ (२९-०८-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध क्षेत्रातील असंघटीत कामगारांसाठी असलेल्या अनेक कल्याणकारी मंडळाऐवजी एकच कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळाच्या कार्यपध्दतीचे स्वरुप काय राहणार आहे तसेच, सदरचे महामंडळ केव्हा पासून अस्तित्वात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (११-११-२०१६) :** (१) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी असंघटित, कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारित केलेला असून या अधिनियमाच्या कलम - १४ अन्वये महाराष्ट्र शासनाने दि. ३०.०५.२०१३ रोजीच्या अधिसूचनाद्वारे महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा नियम, २०१३ पारित केलेले आहेत. उक्त अधिनियमाच्या कलम ६(१) अन्वये असंघटित कामगारांसाठी राज्यस्तरीय कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत कार्यवाही शासनस्तरावर प्रगतिपथावर आहे. मंडळ स्थापन झाल्यावर त्याच्यामार्फत असंघटित कामगारांची नोंदणी केली जाऊन असंघटित कामगारांसाठीच्या विविध कल्याणकारी योजना राबविणे शक्य होईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या ई- वार्डातील पेन्शनधारकांना पेन्शन मिळाली नसल्याबाबत

**(२८) ५५३०८ (२९-०८-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या ई- वार्डातील सुमारे १२०० पेन्शनधारकांना पेन्शन मिळाली नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वार्डातील संगणक विभागातील काही त्रुटीमुळे या पेन्शन धारकांना कुचंबणा सहन करावी लागत आहे तरी याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) माहे एप्रिल, २०१६ मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नवीन धोरणात्मक कार्यपध्दतीमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १२४९ निवृत्तीवेतनधारकांशी व संबंधित बँकांच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधून नवीन खाते क्रमांक प्राप्त करुन दिनांक १३ मे, २०१६ रोजी ७७८, जून, २०१६ मध्ये ६८, जुलै, २०१६ मध्ये १७७, ऑगस्ट, २०१६ मध्ये ८० व सप्टेंबर, २०१६ मध्ये १२ अशा एकूण १११५ निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनाचे अधिदान करण्यात आले आहे.

उर्वरित १३४ निवृत्तीवेतनधारकांनी संपर्क न साधल्याने त्यांना अधिदान करणे प्रलंबित असून त्यांच्याशी संपर्क साधण्याचे प्रयत्न महानगरपालिका स्तरावर सुरु आहेत.

---

## धुळे येथील पांझरा नदीच्या सौंदर्यीकरणाबाबत

**(२९) ५५५७४ (२९-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.काशिराम पावरा (शिरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील पांझरा नदीच्या सौंदर्यीकरणासाठी महानगरपालिकेने रुपये ५ कोटीचा आराखडा तयार करुन प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) व (२) धुळे महानगरपालिकेमार्फत रु.२५२.५८ कोटींचा पांझरा नदी सुधार प्रस्ताव पर्यावरण विभागामार्फत केंद्र शासनास पाठविण्यात आला होता. मात्र केंद्र शासनाने निधी अभावी सदरचा प्रस्ताव दि.२६.२.२०१६ रोजी परत केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुळा-मुठा या नद्यांच्या प्रदूषणात वाढ होत असल्याबाबत**

**(३०) ५५७३३ (२६-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केशवनगर (ता.जि.पुणे) येथील मुंढवा परिसरात मुळा-मुठा या नद्यांच्या प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत असून या नद्यांच्या प्रदूषणामुळे दुर्गंधी पसरल्याने नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुर्गंधीमुळे मुंढवा, केशवनगर, वडगांवशेरी, खराडी व साईनाथनगर परिसरात डासांची उत्पती वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६) :** (१) केशवनगर पुणे येथील मुंढवा हा परिसर मुळा-मुठा नदीच्या पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्वात शेवटचा भाग असल्याने मुळा-मुठा नदीचे, वरील भागातील म्हणजेच पुणे व खडकी कॅन्टोमेंट बोर्ड, शिवणे, खडकवासला, नांदेड किरकटवाडी, कोपरे धावडे इ. भागातील मैलापाणी तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका हद्दीतील प्रक्रिया होऊन आलेले व विनाप्रक्रिया आलेले मैलापाणी या ठिकाणी एकत्रित होते. त्यामुळे या परिसरात नदीचे प्रदुषण होत असून काही प्रमाणात दुर्गंधीही पसरते.

(२), (३) व (४) मुंढवा, वाडगांवशेरी व खराडी या परिसरात किटकजन्य आजारांनी बाधित रूग्ण आढळून आले आहेत. आरोग्य कार्यालय, किटक प्रतिबंधक विभागामार्फत मुंढवा, वडगावशेरी व खराडी परिसरातील नदी, तलाव पात्रामधील जलपर्णीचे निर्मुलन करण्यात आले आहे.

पुणे महानगरपालिके मार्फत डासांच्या उत्पत्तीस आळा घालण्यासाठी वेळोवेळी उपाय योजना केल्या जातात. किटक आजारांनी बाधित रूग्णांचे निवासस्थाने सभोवताली परिसरात डास प्रतिबंधक धुर फवारणी करण्यात येते.

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये काही प्रमाणात विनाप्रक्रिया मैलापाणी नदीत मिसळत असल्याने, याबाबत करण्यात येतात. एकूण ७६७ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेची एकूण १० मैलापाणी शुध्दीकरण केंद्र पुणे महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आली आहेत. राष्ट्रीय नदी कृती कार्यक्रमांतर्गत उपायोजना करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

---

**मुंबईतील सर्व नागरिकांना समान पाणी मिळणेबाबत**

**(३१) ५५८८४ (२६-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर्व नागरिकांना समान पाणी मिळावे यासाठी समन्यायी पाणी वाटपाबाबतचा

कृती आराखडा दोन महिन्यात तयार करण्याचे आदेश राज्य शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस माहे एप्रिल, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात अथवा त्या सुमारास देण्यात आलेले असून पाणी गळती आणि वितरण व्यवस्थेचा अभ्यास करुन उपाय सुचविण्यासाठी जलतज्ञांची समिती त्याच दरम्यान गठीत करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार समन्यायी पाणी वाटपाचा कृती आरखडा तयार करयात आला आहे काय, तसेच जलतज्ञांच्या समितीने आपला अहवाल सादर केला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त कृती आराखडा व जलतज्ञांच्या समितीचा अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, कृती आराखडा व जलतज्ञांच्या समितचा अहवाल प्राप्त झाला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मुंबईतील सर्व नागरीकांना समान पाणी मिळावे यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने ४ तज्ञांची समिती तयार केली असून सदर समितीची पहिली बैठक दिनांक १७.९.२०१६ रोजी झाली आहे. सदर बैठकीत तज्ञांना मुंबईची सध्याची पाणीपुरवठा व्यवस्था, होणारा पाणी पुरवठा, पाणी पुरवठा करणारी धरणे, जलकुंभ तसेच जलवाहिन्यांची माहिती देण्यात आली आहे.

सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर समितीच्या शिफारशीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

### कल्पतरु बिल्डरने आंबा-नारळाची तब्बल ६५ झाडे तोडल्याबाबत

**(३२) ५६२१८ (२६-०८-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चांदिवली डी मार्ट येथील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जमिनीवर कल्पतरु बिल्डरला आलिशान इमारत बांधता यावी यासाठी तेथील आंबा व नारळाची तब्बल ६५ झाडे तोडण्यास महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाने मंजूरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ६५ झाडे तोडण्यास परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :**(१) चांदिवली मुंबई येथील डी मार्टजवळ प्रस्तावित इमारतीच्या कामात अडथळा करणारी आंबा, नारळ इत्यादी जातींची ४६ झाडे कापण्यास व १९ झाडे पुनर्रोपित करण्यास (एकूण ६५ झाडांकरीता) वृक्ष प्राधिकरण समितीच्या ठराव क्र.३४,

दिनांक १६.०४.२०१६ रोजी मिळालेल्या मान्यतेनुसार मे.कल्पतरू व शर्यास यांना दिनांक २१.४.२०१६ रोजी परवानगी देण्यात आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इनोव्हेन्टीव इंडस्ट्रीज लिमीटेड या कंपनीतील ३७२ कामगारांना पुन्हा कामावर घेण्याबाबत**

**(३३) ५६३३१ (२९-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सणसवाडी व पिंपळे जगताप, तालुका शिरुर, जिल्हा पुणे येथील इनोव्हेन्टीव इंडस्ट्रीज लिमीटेड कंपनीतील २ युनीट मधील ३७२ कामगारांना पुन्हा कामावर घेण्याचे आदेश कामगार आयुक्त यांनी दिनांक १० मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास कंपनी प्रशासनाला दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामगार आयुक्तांनी आदेश देवुनही इनोव्हेन्टीव कंपनी प्रशासन कामगारांना पुन्हा कामावर घेण्याबाबत टाळाटाळ करत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या ३७२ कामगारांना कामावर रुजु करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (०७-११-२०१६) :** (१) अपर कामगार आयुक्त, पुणे यांनी, ३७२ कायम कामगारांना पुन्हा कामावर घेण्याबाबत कंपनी व्यवस्थापनास दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे,
(२) होय.

तशा आशयाचे निवेदन कामगार संघटनेने दिनांक २७/०१/२०१६ रोजी अपर कामगार आयुक्त, पुणे यांना दिले होते.
(३) होय.

कामगार संघटनेच्या दिनांक २७/०१/२०१६ रोजीच्या निवेदनास अनुसरुन अपर कामगार आयुक्त, पुणे यांनी केलेल्या मध्यस्थीनुसार व दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या पत्रानुसार १८४ कामगारांना कामावर हजर करुन घेण्यात आले आहे. तसेच उर्वरित कामगारांना कामावर हजर करुन घेण्याबाबत कामगार संघटनेने मा.औद्योगिक न्यायालय, पुणे येथे MRTU PULP अधिनियमांतर्गत तक्रार अर्ज दाखल केला असून सदर प्रकरण सद्यस्थितीत मा.न्यायालयात प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांच्या मागण्यांबाबत**

**(३४) ५६९७७ (२९-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांनी आपल्या विविध मागण्यांकरिता कोल्हापूरचे पालकमंत्री यांच्या निवासस्थानी दिनांक १ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास मोर्चा काढून निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (११-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना साहीत्य खरेदी करण्यासाठी देण्यात येणाऱ्या रु. पाच हजार लाभाच्या परिपत्रकात बदल करुन, दि.३१ मार्च, २०१६ पर्यंत नोंदीत व जिवीत असलेल्या कमागरांना रु. ५ हजारांचा लाभ देण्याची मागणी दि.९/६/२०१६ च्या निवेदनात लाल बावटा बांधकाम व्यवसायक कामगार संघटना (सिटू), कोल्हापूर, यांनी केली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील जिवीत नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या “महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना” लागू करण्याबाबतचा शासन निर्णय दि २१.०९.२०१६ रोजीनिर्गमित करण्यात आला आहे तसेच महामंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांच्या प्रती कुटुंबास दर तीन वर्षातून एकदा अवजारे खरेदी करण्यासाठी रु. पाच हजार देण्याबाबतचे शासन पत्र दि. ५.४.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. तथापि सदरहू प्रकरणी अधिक सुस्पष्टता आणण्याकरिता केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मागितले आहे.

(३) (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांडूप (पूर्व) येथील वीर सावरकर मार्ग व एम.डी. केणी मार्गाच्या रुंदीकरणाबाबत**

**(३५) ५७४६२ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील भांडूप पुर्व येथील महानगरपालिका शाळेजवळ वीर सावरकर मार्ग व कमल स्टोअर्सजवळ एम.डी. केणी मार्ग, येथील रस्ता अतिशय अरुंद असल्याने येथे सतत अपघात होऊन वाहतुकीची कोंडी निर्माण होत असते. या ठिकाणच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्याची मागणी स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधी अनेक वर्षापासून करीत आहेत. परंतु प्रशासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्याची बाब माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१६) :** (१) सदर ठिकाणच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्याची मागणी स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधी करीत असल्याची बाब खरी आहे.
(२) व (३) सदर रस्ता रुंदीकरणात बाधीत बांधकामधारकांची कागदपत्रे महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आली असून, सदर बांधकामधारकांची पात्रता निश्चित करण्याचे काम सुरु आहे.

पात्रता निश्चित झाल्यानंतर पात्र बांधकामधारकांना महानगरपालिकेमार्फत पर्यायी जागा देण्यात येईल व तद्नंतर रस्ता रुंदीकरण करण्यात येणार आहे.

---

**भांडूप पूर्व ते भांडूप पश्चिम जोडणारा उड्डाण पुल बांधणेबाबत**

**(३६) ५७४७८ (२६-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मधील भांडूप येथे पूर्व ते पश्चिम जोडणारा उड्डाण पुल नसल्यामुळे येथील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याने स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधी अनेक वर्षापासून भांडुप पूर्व ते पश्चिम जोडणारा उड्डाण पूल बांधण्याची मागणी करीत असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भांडुप पूर्व ते पश्चिम जोडणारा उड्डाण पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१६) :** (१) हेखरे आहे.
(२) व (३) भांडुप (पुर्व) ते भांडुप (पश्चिम) जोडणारा उड्डाणपुल व रस्त्याच्या समावेश करण्याची तरतूद प्रस्तावित २०१४-२०३४ च्या मसुदा विकास आराखड्यात करण्यात आलेली आहे.

सदर मसुदा विकास नियोजन आराखड्यास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत सदर उड्डाणपूल बांधण्याची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येणार आहे.

---

**कळंब (जि. उस्मानाबाद) शहरातील आरक्षण क्र. ३५ मधील प्राथमिक शाळेच्या इमारतीचे प्रलंबित भाडे, अनामत रक्कम व मालमत्ता कर वसूल करणेबाबत**

**(३७) ५८५७३ (२९-०८-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंब (जि.उस्मानाबाद) शहरातील आरक्षण क्र. ३५ मधील प्राथमिक शाळेच्या इमारतीचे

प्रलंबित भाडे, अनामत रक्कम व मालमत्ता कर वसूल करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत ही नगर परिषदेच्या दिनांक ०२ जुन, १९९९ च्या ठराव क्र. ३१८ नुसार व तदनंतर दिनांक १६ मार्च २००० च्या ठराव क्र. ४६६ नुसार प्रथम शिवसेवा युवक मंडळास तर नंतर शिवसेवा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टला देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त संस्थांनी हि इमारत ताब्यात घेतल्यानंतर आजतागायत नगर परिषदेचे कसलेही देणे दिले नसल्यामुळे नगर परिषदेचे झालेले आर्थिक नुकसान लक्षात घेता याबाबत कारणीभूत असणाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) होय,

(२) कळंब नगरपरिषद विकास आराखड्यातील आ.क्र. ३५ प्राथमिक शाळेसाठी आरिक्षत असलेल्या जागेवर ८ वर्ग खोल्यांची इमारत बांधण्यात आली होती.

नगर परिषद सर्वसाधारण ठराव क्र. ३१८ दि.०२.०६.१९९९ अन्वये शिवसेवा युवक मंडळास भाडेतत्तवार देण्याचा ठराव पारीत करण्यात आला होता. मात्र सदर संस्थेने इमारत ताब्यात घेतली नाही.

शिवसेवा पब्लिक चॅरीटेबल ट्रस्टला नगरपरिषद सर्वसाधारण सभा दि. १६.०३.२००० मधील ठराव क्र. ४६६ अन्वये दि. २६.०५.२००० रोजी करारनामा करुन इमारत भाडे तत्वावर देण्यात आली आहे.

(३) त्रिसदस्यीय समितीने दि.२३.०३.२०१६ रोजी सुधारित भाडेनिश्चिती केलेली आहे. त्यानुसार अनामत रक्कम रु. ११ लक्ष व एकूण वार्षिक भाडे मालमत्ता कर रु.१,२५,२९९ आकारणी केलेली आहे.

दिनांक ०१.०६.२००० ते ३१.०३.२०१६ पर्यंत एकूण भाडे रक्कम रु. १९.७३ व अनामत रक्कम रु. ११ लक्ष अशी एकूण रु. ३०.७३ लक्ष इतकी मागणी करण्यात आलेली आहे त्यापैकी, रु. ५ लक्ष रुपये संस्थेने नगरपरिषदेकडे भरलेली आहे व उर्वरित रक्कम टप्या टप्याने भरण्यासठी ६ महिने मुदतीची मागणी संस्थेने केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लोअर परळ व वरळी येथील म्हाडाच्या ताब्यातील गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगार व त्यांच्या वारसांना हक्काची घरे मिळण्याबाबत

**(३८) ५८८७७ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ येथील न्यू ग्रेट ईस्टर्न, मातुल्य, मफतलाल नंबर-३, आणि वरळी येथील

व्हिक्टोरिया, बॉम्बे डाइंग या गिरण्यांच्या जमिनी गेल्या दोन वर्षांपासून म्हाडाच्या ताब्यात असतानाही बांधकामाचे प्रस्तावित आराखडे व महानगरपालिकेकडून त्यास देण्यात येणारी मंजुरी प्रलंबित असल्याने गिरणी कामगार व त्यांच्या वारसांना हक्काच्या घरापासून वंचित राहावे लागले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०७-११-२०१६) :** (१), (२) व (३) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त अहवालानुसार बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली ५८(१) (ब) नुसार म्हाडास प्राप्त झालेल्या मातुल्य मिल, लोअरपरळ, मफतलाल मिल नं. ३ लोअर परळ व व्हिक्टोरिया मिल वरळी येथील गिरण्यांच्या भूखंडाचा आकार (क्षेत्रफळ) लहान असल्याने बृहन्मुंबई महापालिकेच्या हिश्श्याच्या भूखंडाबरोबर अदलाबदल करण्याच्या प्रस्तावास नगर विकास विभागाच्या दि.१७.०३.२०१५ च्या अधिसूचनेन्वये मान्यता मिळाली असून त्यानुसार सदरहू गिरण्यांसह अन्य तीन गिरण्यांच्या जमीनीवर गिरणी कामगारांसाठी ४४४ सदनिका व २१८ संक्रमण सदनिका असे एकूण ६६२ सदनिका प्रस्तावित आहेत.

न्यु ग्रेट इस्टर्न मिलचा ताबा दि. ३०.०६.२०१६ रोजी म्हाडास प्राप्त झाला असून सदरहू प्रकल्पासाठी खुली निविदा मागवून सदर प्रकल्प सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच गिरणी कामगार टप्पा २ अंतर्गत बॉम्बे डाईंग मिल वडाळा येथे गिरणी कामगारांसाठी ३२८२ सदनिका आणि १७२८ संक्रमण सदनिका अश्या एकूण ५०१० सदनिकांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदरहू प्रकल्प मार्च, २०१८ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे, असे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

---

### सूर्या उदभव धरण ४०३ द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेबाबत

**(३९) ५९८४६ (२६-०८-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाची जे.एन.यु.आर.एम. योजना बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सूर्या उदभव धरण ४०३ द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर अहवाल राज्य शासनाची मान्यता घेवून केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेतून निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात वाढणारी लोकसंख्या लक्षात घेवून वसई-विरार शहर महानगरपालिकेने ही योजना स्वत: राबविण्याची तयारी दर्शविली असुन तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य स्तरीय सुकाणु समितीच्या मान्यतेने केंद्र सरकारच्या जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत मान्यतेकरीता दिनांक २०.०२.२०१३ रोजी पाठविण्यात आला होता. तथापि, केंद्र शासनाची सदर योजना बंद झाल्यामुळे या प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली नाही.
(३), (४) व (५) वसई-विरार महानगरपालिकेसाठी १३१ दशलक्ष लिटर क्षमतेचा उद्‌भव उपलब्ध असून आणखी १०० दशलक्ष लिटर क्षमता वाढीचा प्रकल्प नगरोत्थान महाभियाना अंतर्गत अंतिम टप्प्यात आहे. अमृत अभियानांतर्गत रु. १३५.२६ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास शासनाने मान्यता दिली आहे.

---

## धमूपानविरोधी कायद्यातील बदलामुळे विडी कामगारांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत

**(४०) ५९९१५ (२९-०८-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धमूपानविरोधी कायद्यातील बदलाच्या विरोधात राज्यातील हजारो बिडी उद्योजकांनी पुकारलेल्या संपामुळे विडी कामगारांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १ एप्रिल, २०१६ पासून उत्पादन बंद ठेवून हा संप पुकारला असून या संपामुळे दोन महिला कामगारांनी आत्महत्या केली तर सहा महिलांनी आत्महत्येचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विडी कामगारांच्या संपाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, विडी कामगारांसाठी पर्यायी उदरनिर्वाहाचे साधन म्हणून शासन काय उपाययोजना करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२४-१०-२०१६) :** (१) विडी उद्योजकांनी दिनांक ०१/०४/२०१६ पासून उत्पादन बंद ठेवून संप पुकारला होता. सद्य:स्थितीत सर्व विडी कारखाने नियमितपणे सुरू आहेत.
(२) व (३) विडी उद्योजकांनी दिनांक ०१/०४/२०१६ पासून उत्पादन बंद ठेवून संप पुकारला होता. सदर संपकाळात कोणत्याही महिलांनी आत्महत्या केली नाही अथवा आत्महत्येचा प्रयत्न केलेला नाही. सदर संपाबाबत सहायक कामगार आयुक्त, यांनी सोलापूर येथे दिनांक ०५/०४/२०१६ रोजी बंद काळात विडी उद्योग संघाचे मालक प्रतिनिधी व विडी कामगारांच्या प्रतिनिधीची बैठक घेतली. तसेच सहायक कामगार आयुक्त, सोलापूर येथे दिनांक ०५/०४/२०१६ रोजी श्री.शरद बनसोडे, खासदार सोलापूर यांचे समोर उभय पक्षांची बैठक घेतली. अपर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या दालनात दिनांक ०७/०४/२०१६ रोजी अभय पक्षांची बैठक घेण्यात आली व विडी कारखाने त्वरीत सुरू करावेत अशा सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच मा.राज्यमंत्री (कामगार) तथा पालक मंत्री सोलापूर यांचेसमोर दिनांक १८/०४/२०१६ रोजी उभयपक्षांची बैठक घेण्यात आली व कारखाने त्वरीत सुरू करणेबाबत आवाहन करण्यात आले होते. दिनांक १५/१०/२०१४ रोजीच्या अधिसूचनेतील सुधारणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गोरगरिब जनतेने लाखो रुपये गुंतवून घेतलेली घरे अनधिकृत ठरवून तोडण्याच्या नोटीसा देण्यात येत असल्याबाबत

**(४१) ६०२१२ (२९-०८-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गोरगरिब जनतेने लाखो रुपये गुंतवून घेतलेली घरे अनधिकृत असल्याचे निदर्शनास आल्यावरुन या इमारती तोडण्याच्या नोटीसा देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईतील अनधिकृत इमारतींना अधिकृत करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय तसेच यापुढील काळात अशाप्रकारे अनाधिकृत इमारत बांधल्याच जाऊ नये यासाठी कोणती दक्षता घेण्यात येणार आहे,
(३) तसेच यापूर्वीच्या अनधिकृत इमारतीतील नागरिक बेघर होऊन नये यासाठी कोणते धोरण शासनाने आखले आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१६) :** (१) होय, नवी मुंबईतील दिघा परिसरातील अनधिकृत इमारती तोडण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) होय, राज्यातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी शासनाने धोरण निश्चित केलेले आहे. सदर धोरणास मा.मंत्रीमंडळाने दि.२८/७/२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मंजूरी दिलेली आहे. मा.मंत्रीमंडळाने मंजूरी दिलेले सदर धोरण मान्यतेसाठी दि. २९/७/२०१६ च्या शपथपत्रान्वये मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेले असून प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

**दिघा गावातील बेकायदा बांधकामावर कारवाई करण्याबाबत**

**(४२) ६०६५७ (२९-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पूर्वीच्या झोपडपट्टयांसह राज्यातील सर्व बेकायदा बांधकामे नियमित करणारे सरकारचे प्रस्तावित धोरण बेकायदा असल्याचे उच्च न्यायालयाने घाषीत करुन नवी मुंबईतील दिघा गावातील बेकायदा बांधकामावर कारवाई करण्याचे आदेश दिल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॅम्पा कोलातील उच्चभ्रुंच्या निवाऱ्यांना शासनाने संरक्षण दिल्याप्रमाणे गरीब दिघावासियांच्या घरांनाही शासनाने संरक्षण द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे दिघा येथील सुमारे २५००० कुटुंबाना बेघर होण्याची वेळ आली असुन पाडण्यात येणाऱ्या इमारतींमध्ये राहणाऱ्या कुटुंबाना पर्यायी घरे उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मा.उच्च न्यायालयाने दि. २६-२७ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या आदेशातील मुद्दे विचारात घेऊन नागरी भागातील अनधिकृत बांधकामे नियमित करणेसाठी नगर विकास विभागाने नवीन धोरण तयार केले असून सदर धोरणास मा.मंत्रीमंडळाने दि. २८/७/२०१६ च्या बैठकीमध्ये मंजूरी दिलेली आहे. मा.मंत्रीमंडळाने मंजूरी दिलेले धोरण दि. २९/७/२०१६ च्या शपथपत्रान्वये मा.उच्च न्यायालयात मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

**औरंगाबाद महानगरपालिकेत झालेल्या UDR घोटाळ्यातील निलंबित अधिकाऱ्यांच्या निलंबनानंतरही सरकारी कामातील हस्तक्षेपाबाबत**

**(४३) ६१२९६ (२९-०८-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेत झालेल्या UDR घोटाळ्यात निलंबित करण्यात आलेल्या नगर रचना विभागाच्या तीन अधिकाऱ्यांपैकी, दोन अधिकारी महानगरपालिकेच्या नगररचना विभागात येतात आणि त्यांच्या टेबलावरच्या सर्व फाईली हाताळतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्तांचे आदेशाची अंमलबजावणी न करता हे अधिकारी कार्यालयात येवुन त्यांच्याच टेबलावर काम करतात त्यामुळे त्यांच्याविरुध्द सुरु असलेल्या प्रकरणांची निरपेक्ष चौकशी होवू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना शहरास पाणीपुरवठा करण्याऱ्या जलवाहीनीचा पाईप खाजगी दुरध्वनी कंपनीकडून खोदकाम करतांना फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेल्याबाबत**

**(४४) ६१३७२ (२९-०८-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरास पाणी पुरवठा करण्याऱ्या जलवाहीनीचा पाईप एका खाजगी दुरध्वनी कंपनीकडून केबल टाकण्यासाठी करण्यात येणाऱ्या खोदकामा दरम्यान फुटल्याने लाखो लिटर पिण्याचे पाणी वाया गेल्याची घटना दिनांक २३ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीकडून खोदकामाची रितसर परवानगी घेण्यात आली होती काय व निष्काळजीपणे केलेल्या खोदकामाबाबत सदर कंपनीवर कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) व (२) जालना शहरास पाणीपुरवठा करणारी जालना-पैठण जलवाहिनी दिनांक २३ एप्रिल, २०१६ रोजी खाजगी भ्रमणध्वनी कंपनीकडून केबल टाकण्यासाठी करण्यात येणाऱ्या खोदकामा दरम्यान फुटली होती. सदरील बाब लक्षात येताच तातडीने अंबड येथील पंप बद करण्यात आले. त्यामुळे मोठ्या प्रमाणाम पाणी वाया गेले नाही.

सबंधित एजन्सीकडून तात्काळ जलवाहिनी दुरुस्त करुन घेतली व पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला. नगरपरिषद हद्दीत नसल्याने खोदकामाची परवानगी घेण्यात आलेली नव्हती. संबंधित एजन्सीने जलवाहिनी स्वखर्चाने दुरुस्त करुन दिल्याने दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाची थकीत रक्कम मिळण्याबाबत**

**(४५) ६१७२४ (२९-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाची ८२ महिन्यांची थकीत रक्कम मिळण्याबाबत वि.स.स. अचलपूर यांनी दिनांक १३ मे,२०१६ रोजी कामगार सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडे लेखी पत्र लिहून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२१-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रस्तावासंदर्भात वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयांची माहिती संबंधितांकडून प्राप्त करून पुढिल कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हदगांव (जि. नांदेड) नगरपालिकेने शहरातील घनकचऱ्याचा ठेका खाजगी एजन्सीला दिल्याबाबत**

**(४६) ६२०२३ (२९-०८-२०१६). श्री.नागेश आष्टीकर-पाटील (हदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगांव (जि. नांदेड) नगरपालिकेने शहरातील घनकच-याचा ठेका खाजगी एजन्सीला दिला असून सदरचा कंत्राटदार घनकचरा न उचलताच बिलाची रक्कम उचलत असल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील घनकच-यांचे ढीग व नाल्यातील घनकचरा तसाच पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात मुख्याधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रार करुनही कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) शहरात मुख्य रस्त्यावर जमा होणारा कचरा दररोज सकाळी १० वाजेपर्यंत उचलण्यात येतो व लगेच क्षेपणभुमीमध्ये टाकण्यात येतो. त्यानंतर शहरामधील नाल्यामधून काढलेला गाळ, कचराकुंडीमधील कचरा व शहरात इतर ठिकाणी जमा होणारा कचरा एकत्रित करुन दोन ट्रक्टर द्वारे क्षेपणभूमीवर टाकण्यात येतो. संबंधित ठेकदारांच्या कामाबाबत तक्रारी आल्यास संबंधित नोटीस देऊन कामात त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यास वेळोवेळी नगर परिषदेकडून दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोले नगरपंचायतीतील (जि.अहमदनगर) रिक्त पदे भरण्याबाबत

**(४७) ६२३७४ (२६-०८-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले ग्रामपंचातीस (जि.अहमदनगर) सन २०१४ मध्ये नगरपंचायतीचा दर्जा मिळाला परंतु अधिकारी/कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याने व प्रभारी अधिकारी कर्मचाऱ्यांद्वारे नगरपंचायतीचा कारभार चालवावा लागत असल्याने नगरपंचायत क्षेत्रातील कामे मंद गतीने होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे न भरण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर नगरपंचायत अधिकारी/कर्मचारी यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) व (२) दिनांक ५ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे.
(३) दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे अकोले नगरपंचायत येथे मुख्याधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शासन सूचनांनुसार पद भरती करण्याबाबत विभागीय आयुक्त स्तरावरील समिती मार्फत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्रातील ४८० कर्मचाऱ्यांची सेवा खंडीत केल्याबाबत**

**(४८) ६२६०९ (२९-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्रात १० ते १५ वर्षापासून हंगामी स्वरुपात काम करीत असलेल्या सुमारे ४८० कर्मचाऱ्यांची सेवा गेल्या सहा महिन्यापासून खंडीत करण्यात आल्यामुळे हे कर्मचारी दिनांक २३ मे, २०१६ पासून आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषण करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.कामगार मंत्री यांनी प्रधान सचिव महाराष्ट्र शासन मंत्रालय, तसेच आयुक्त, कामगार कल्याण मंडळ यांना दिनांक १६ मार्च, २०१६ रोजीच्या पत्रान्वये कळवून देखील त्याची अंमलबजावणी अद्याप करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२१-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. तथापि, हंगामी कर्मचाऱ्यांची संख्या १७ असून त्यापैकी फक्त ८ कर्मचाऱ्यांची सेवा १० वर्षे खंडीत स्वरूपाची झालेली आहे.

(२) हे खरे नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सर्व पदावर नियुक्त्या विहीत मार्गाने करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याची बाब विचारात घेता येणार नाही. ही बाब तत्कालीन मा.मंत्री (कामगार) यांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर महानगरपालिकेत कंत्राटी पध्दतीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे मानधन वाढविल्याबाबत**

**(४९) ६३६४८ (२६-०८-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगरपालिकेतील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी पध्दतीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे मानधन महानगरपालिका प्रशासनाने

नियमबाह्यरित्या वाढविल्याचे माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नियमबाह्य मानधन वाढविण्याऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१६) :** (१) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत समाविष्ट आरसीएच कर्मचाऱ्यांचे सुधारित मानधन हे आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक (रा.ग्रा.आ.अ.) महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र दिनांक २८/१०/२०१३ नुसार तसेच दिनांक २८/१०/२०१५ अन्वये सन २०१५-१६ मंजूर पी.आय.पी.नुसार मानधन वाढ करण्याबाबत प्रशासकीय निर्णय घेण्यात आला.
(२) व (३) याबाबत, चंद्रपूर महानगरपालिकेच्या दिनांक २७/०७/२०१६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.३१ पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे, आयुक्त, चंद्रपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

**अदानी पॉवर महाराष्ट्र लि. तिरोडा (जि.गोंदिया) येथे कामगारांची पिळवणूक होत असल्याबाबत**

**(५०) ६३८७३ (२९-०८-२०१६). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अदानी पॉवर महाराष्ट्र लि.तिरोडा (जि.गोंदिया) येथे Contract labor Act १९७१ च्या Rule १९७० प्रमाणे वेतन देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे कार्यरत कामगारांना लघुत्तम वेतन नियमाप्रमाणे किमान किती वेतन देण्यात येते तसेच, अदानी पावर समुहातील विविध कपंनीमध्ये स्थानिकांना रोजगार देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२१-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
मे. अदानी पॉवर महाराष्ट्र, तिरोडा येथील कंत्राटी कामगारांना कंत्राटदारांमार्फत त्यांच्या बँकेच्या खात्यांत थेट वेतन जमा करण्यात येते.
(२) हे ही खरे नाही.
मे.अदानी पॉवर महाराष्ट्र लि., तिरोडा येथील कामगारांना कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम २ पोट कलम (एम) या व्याख्येतील “कारखाने” या अनुसूचित रोजगारातील झोन क्र.३ चे किमान वेतन दर लागू असून कामगारांना त्यानुसार वेतन अदा करण्यात येते. सदर प्रकल्पात २,५२० कंत्राटी कामगारांपैकी २,०२४ कामगार हे स्थानिक असून ४९६ कामगार

आंतरराज्यीय आहेत. मे.अदानी पॉवर महाराष्ट्र लि., तिरोडा या प्रकल्पात ८० टक्के पेक्षा जास्त स्थानिक कामगारांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.